दिनांक ०३/०२/२०२१

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी परमेश्वर उत्तम चव्हाण वय ३६ वर्ष, व्यवसाय विद्युत मीटर रिडर (कंत्राटी कर्मचारी) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.औरंगाबाद शाखा खडकेश्वर, औरंगाबाद यांनी लाचेची मागणी करून २,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | :- | आरोपी परमेश्वर उत्तम चव्हाण वय ३६ वर्ष, व्यवसाय विद्युत मीटर रिडर (कंत्राटी) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.औरंगाबाद, शाखा खडकेश्वर, औरंगाबाद. रा. प्लॉट नं. २४९, गट नं. ३७, भारत माता कॉलनी, देवळाई परिसर, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | २,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे घरातील मीटर खराब झाल्याने त्यांच्या जागी नवीन मीटर बसवुन देण्याकरीता |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | तक्रारदार यांच्या राहत्या घरी पडेगांव, औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे घरातील मीटर खराब झाल्याने त्याच्या जागी नवीन मिटर बसुन देण्याकरीता तक्रारदार यांनी परमेश्वर चव्हाण, विद्युत मीटर रिडर यांना विचारणा केली असता परमेश्वर चव्हाण यांनी २,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, परमेश्वर चव्हाण, विद्युत मीटर रिडींग घेणारे यांनी तक्रारदार यांच्याकडे २,५००/- रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती २,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, परमेश्वर उत्तम चव्हाण वय ३६ वर्ष, व्यवसाय विद्युत मीटर रिडर (कंत्राटी) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.औरंगाबाद शाखा खडकेश्वर यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन २,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार गोपाल बरंडवाल, प्रकाश घुगरे, कपील गाडेकर, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

(संदीप रमेश भांड)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद